# सांस्कृतिक उपक्रम व्यक्तिमत्व विकासाचे साधन : मा. अशोकजी झुनझुनवाला

खामगांव (प्रतिनिधी)संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या वतीने निर्देशित आणि महाविद्यालयात सातत्याने आयोजित करण्यात येणारे सांस्कृतिक उपक्रम हे केवळ वेळ घालवण्याचे किंवा मनोरंजनाचे साधन नसून ते व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगी विकासाचे साधन आहे. थोडी हिम्मत दाखवून व्यासपीठावर येऊन पोहोचलात आणि येथे विविध मार्गदर्शकाच्या द्वारे मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला तर आपल्या व्यक्तिमत्वाचा देखील सर्वांगीण विकास होऊन आपणही यशाची प्राप्ती निश्चितपणे करून घेऊ शकता असे विचार विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष मा.अशोकजी झुनझूनवाला यांनी गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथे आयोजित विज्ञान शाखेच्या दीक्षारंभ कार्यक्रमात व्यक्त केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गो.से. विज्ञान,कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव मध्ये आयोजित विज्ञान शाखेच्या दीक्षारंभ कार्यक्रमात उद्घाटनपर भाषणात त्यांनी आपले vichar व्यक्त केले . याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर उपस्थित होते.

प्रास्ताविकामध्ये विज्ञान शाखेच्या दीक्षारंभ कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अरविंद तायडे यांनी या उपक्रमाची पार्श्वभूमी सांगून महाविद्यालयात असलेल्या उपक्रमाबद्दल व विविध सुविधांबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगात असलेल्या सुप्तगुणांना व्यक्त करण्याकरिता दीक्षारंभ कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे असे प्रतिपादन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर आणि महाविद्यालयाबद्दल माहिती सांगून त्यात आजपर्यंत महाविद्यालयाने घेतलेले परिश्रम, गुणवत्ता,विद्यापीठ क्षेत्रात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले उत्तुंग यश या सगळ्यांचा गोषवारा विशद केला. अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य धनंजय तळवणकर यांनी स्पर्धेमध्ये सहभागी होणे हा विजयाचा किंवा विद्यापीठाच्या निवडीचा विषय नाही तर त्यातून मिळणारा सादरीकरणाचा आनंद घ्यायला शिका असे आवाहन केले. प्रा. सचिन शिंगणे व आभार प्रदर्शन प्रा.डॉ. गोकुळ काळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी करिता विद्यार्थी विकास समितीचे समन्वयक डॉ.मधुकर वानखडे, दीक्षारंभ समितीचे आयोजक प्रा.के के पठाण व डॉ. अशोक पडघान यांनी परिश्रम घेतले. या दीक्षारंभ कार्यक्रमाकरिता प्रथम वर्गात प्रवेशित विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अशी माहिती एका प्रसिद्धिपत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी कळविले आहे.

मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी
वरील बातमी फोटोसह आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रकाशित करुन उपकृत करावे ही विनंती